**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार, दिनांक २३ जुलै २०२४**

**ठळक बातम्या**

- **उत्पादकता, रोजगार, सामाजिक न्याय, पायाभूत सुविधा आदी नऊ प्राधान्यक्रमांवर आधारलेला अर्थसंकल्प आज लोकसभेत सादर.**
- **यंदाच्या अर्थसंकल्पात विदर्भ-मराठवाड्यातील सिंचन प्रकल्पांना 600 कोटी, नागपूर मेट्रोसाठी 683 कोटी तर नाग नदी पुनरुज्जीवन प्रकल्पासाठी 500 कोटींची तरतूद.**
- **महागाईने त्रस्त जनतेला दिलासा देण्यासंदर्भात तरतूद नसल्याची विरोधकांची अर्थसंकल्पावर टीका.**
- **विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये आज वादळी पर्जन्यमान, गडचिरोली इथं अतिवृष्टी प्रभावित २० मार्गांची वाहतूक अद्यापही ठप्प.**

****

अर्थसंकल्प

आयकर दात्यांना दिलासा, उद्योग क्षेत्राला चालना, धार्मिक पर्यटनाचा विकास, आणि नैसर्गिक शेतीला चालना देणारा चालू आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज लोकसभेत सादर केला. उत्पादकता, रोजगार, सामाजिक न्याय, शहरी विकास, ऊर्जा सुरक्षा, पायाभूत सुविधा आदी नऊ प्राधान्यक्रमांवर हा अर्थसंकल्प आधारलेला आहे.या अर्थसंकल्पात आयकर रचनेत बदल प्रस्तावित असून, वार्षिक तीन लाख रुपयांपर्यंतचं उत्पन्न पूर्णपणे करमुक्त करण्यात आलं आहे. स्टँडर्ड डीडक्शनची मर्यादा वाढवण्यात आली असून, पगारदारांसाठी ही मर्यादा ७५ हजार रुपये तर कुटुंब निवृत्तीवेतन धारकांसाठी २५ हजार रुपये प्रस्तावित करण्यात आली आहे. सुमारे चार कोटी पगारदारांना याचा लाभ होणार आहे. वार्षिक सात लाख रुपयापर्यंतच्या उत्पन्नावर पाच टक्के, सात लाख ते १० लाख रुपयांपर्यंत १० टक्के, १० लाख ते १२ लाख रुपयांपर्यंत १५ टक्के, १२ लाख ते १५ लाख रुपयांपर्यंत २० टक्के तर १५ लाख रुपयांपेक्षा अधिक वार्षिक उत्पन्नावर ३० टक्के आयकर आकारला जाणार आहे. नव्या कर विवरण पद्धतीने करमूल्यांकनासाठी या तरतुदी लागू असणार आहेत.विदेशी कंपन्यांसाठी

कार्पोरेट कर ३५ टक्के, ई कॉमर्स कंपन्यांसाठी स्रोतावर कर कपात - टीडीएसचा दर एक टक्क्यावरून शून्य पूर्णांक एक टक्का करण्याची तसंच स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्यासाठी एंजल कर रद्द करण्याची तरतूद या अर्थसंकल्पातून करण्यात आली आहे. या अर्थसंकल्पात, कर्करोगावरची औषधं तसंच वैद्यकीय उपकरणांवरचं सीमा शुल्क माफ करण्यात आलं असून, मोबाईल फोन, इलेक्ट्रीक वाहनं, अणु उर्जेसाठी लागणारी उपकरणं, प्लॅटिनम, सोने, चांदी, तांबे तसंच इतर २५ धातूंवरच्या सीमा शुल्कात कपात प्रस्तावित करण्यात आली आहे. तर प्लास्टिक तसंच टेलिफोन उपकरणांवरच्या सीमाशुल्कात वाढ प्रस्तावित करण्यात आली आहे.पीएम आवास योजनेअंतर्गत तीन कोटी अतिरिक्त घरं बांधली जाणार असून, महिला आणि बालिका विकासासाठी तीन लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पंतप्रधान रोजगार आणि कौशल्य प्रशिक्षणासाठी पाच योजनांच्या पॅकेजची घोषणा करण्यात आली. प्रथमच नोकरी शोधणाऱ्यांना कामावर घेण्यास मदत करण्यासाठी नियोक्त्यांना एक महिन्याचा पगार अनुदान म्हणून दिला जाईल. या योजनांमुळे पाच वर्षांत चार कोटी १० लाख युवकांना रोजगार मिळणार असल्याचं सीरातामन यांनी सांगितलं. युवकांसाठी इंटर्नशीप आंतरवासिता योजना सीतारामन यांनी जाहीर केली, यामध्ये पुढच्या पाच वर्षात पाचशे कंपन्यामध्ये युवकांना १२ महिने इंटर्नशीपचा अनुभव मिळणार आहे, यासाठी दरमहा पाच हजार रुपये विद्यावेतन आणि कार्यकाळ पूर्ण झाल्यावर सहा हजार रुपये अर्थसहाय्य केलं जाणार आहे. मुद्रा योजनेत कर्ज मर्यादा २० लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. एक कोटी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीसाठी प्रोत्साहन दिलं जाणार असून, अधिक उत्पादन देणारी ३२ विविध वाणं तसंच बागायती पिकांसाठी शंभरावर नवी वाणं उपलब्ध करून दिली जाणार असल्याचं अर्थमंत्र्यांनी सांगितलं. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी एक लाख ५२ हजार कोटी रुपये, ग्रामीण विकास दोन पूर्णांक ५५ लाख कोटी रुपये, तर शिक्षण, रोजगार आणि कौशल्य विकासासाठी एक लाख ४८ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. बिहार राज्यात रस्ते बांधणीसाठी २६ हजार कोटी तर आंध्रप्रदेशात राजधानी अमरावतीसह विविध प्रकल्पासाठी १५ हजार कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आली आहे.प्रधानमंत्री जनजाती उन्नत अभियानाची घोषणा या अर्थसंकल्पातून करण्यात आली, या माध्यमातून ६३ हजार गावांतल्या पाच कोटी आदिवासी बांधवांना लाभ होणार आहे.

अर्थसंकल्प प्रतिक्रिया

**पंतप्रधान**

हा अर्थसंकल्प म्हणजे समाजाच्या सक्षमीकरणाला चालना देणारा अर्थसंकल्प आहे असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. तरुणांना असंख्य नवीन संधी उपलब्ध करून देणारा हा अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पात शिक्षण आणि कौशल्याला नव्या संधी मिळणार आहे. मध्यमवर्गाला नवे बळ देणारा हा अर्थसंकल्प असून आदिवासी समाज, दलित आणि मागासलेल्या लोकांच्या सक्षमीकरणासाठी भक्कम योजना यात आणल्या गेल्या आहेत, असं पंतप्रधान मोदी यांनी अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना म्हटलं आहे.

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

कर रचनेत मोठे बदल करून सर्वसामान्यांना दिलासा देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोट्यवधी देशवासीयांचा विश्वास सार्थ ठरविला आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेला अर्थसंकल्प शेतकरी, महिला, युवा, कौशल्य विकास, रोजगार, पायाभूत सुविधांची उभारणी, शहरांचा विकास अशा विविध नऊ घटकांवर लक्ष केंद्रीत करणारा 'नवरत्न अर्थसंकल्प' असल्याची प्रतिक्रिया व्यक्त करतानाच युवकांच्या कल्याणासाठी भरीव तरतूद, रोजगाराला चालना देणारा आणि 'विकसित भारत' संकल्पनेला बळ देणारा असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सांगितलं.

**उपमुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस**

महाराष्ट्राच्या विकासासाठी विविध विभागांतर्गत सुमारे सात हजार ५४५ कोटी रुपयांची भरीव तरतुद या अर्थसंकल्पात करण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. त्यात विदर्भ, मराठवाडा सिंचन प्रकल्पासाठी ६०० कोटी, ग्रामीण रस्ते सुधार योजना ४०० कोटी, सर्व समावेशक कामांसाठी ४६६ कोटी, यांसह नागपूर मेट्रोसाठी ६८५ कोटी, नाग नदी सुधार योजनेसाठी ५०० कोटी आदी तरतुदी करण्यात आल्या आहेत. एकूणच आदिवासी बांधवांसाठी जनजातीय ग्रामोन्नती अभियान ६३ हजार गावांमध्ये राबवण्यात येणार आहे. आयकरात मोठ्या प्रमाणावर मध्यमवर्गीयांचा

फायदा होणार आहे. सुमारे १७,५०० रुपयांची वार्षिक बचत होणार असल्याचंहि फडणवीस म्हणाले.

**मंत्री मुनगंटीवार**

तर आजच्या अर्थसंकल्पात वित्तीय तूट सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ४.९% इतकी कमी राखली गेली आहे, हे कौतुकास्पद आहे, असं मंत्री मुनगंटीवार म्हणाले. देशात विकासात्मक कामांवरील आणि कल्याणकारी योजनांवरील खर्च वाढत असतांना तूट कमी करण्याच आव्हान मोदी सरकारन पेलून दाखवलं आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

**अर्थमंत्री अजित पवार**

तर सर्व क्षेत्रांच्या विकासाला बळ देणारा, मजबूत-विकसित भारताची पायाभरणी करणारा, देशाला विश्वशक्ती बनवण्याच्या वाटेवर नेणारा हा अर्थसंकल्प आहे अशा शब्दात उपमुख्यमंत्री तथा राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय अर्थसंकल्पाचं स्वागत केलं आहे.

**नाना पटोले**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारमन यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात फक्त मोठमोठे आकडे आणि आकर्षक घोषणा आहेत, कोणतेही धोरण आणि व्हिजन नाही. गेल्या १० वर्षापासून मोदी सरकारच्या अर्थसंकल्पात जनतेच्या हितापेक्षा हेडलाईन मॅनेजमेंटचीच काळजी घेतलेली दिसते. असं महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले म्हणाले. देशात आज बेरोजगारीची मोठी समस्या असताना तरुणांना पक्क्या नोकऱ्या देण्यासाठी सरकारकडे कोणतेही ठोस धोरण नाही. शेतकऱ्यांना दिलासा देणारी एकही योजना अर्थसंकल्पात दिसत नाही. महागाईने त्रस्त जनतेला दिलासा देण्यासंदर्भात तरतूद नाही, एनडीए सरकारच्या अर्थसंकल्पाने सर्व घटकांची घोर निराशा केली असून शेतकरी, महिला, तरुण, विद्यार्थी, लघु, छोटे व मध्यम उद्योगासह सर्वसामान्यांची निराशा केली आहे. सरकार टिकवण्यासाठी बिहार आणि आंध्रप्रदेशला मोठा निधी आणि महाराष्ट्राच्या तोंडाला मात्र पाने पुसली आहेत अशा शब्दांत नाना पटोले यांनी अर्थसंकल्पावर टीका केली आहे.

**विजय वडेट्टीवार**

तर महाराष्ट्राला सापत्न वागणुक दिल्याची टीका करत, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांच्या पक्षाने केंद्र सरकारला पाठिंबा दिल्यामुळेच या दोन्ही राज्यांना भरभरून देण्यात आल्याचा आरोप विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

राज्य मंत्रिमंडळ निर्णय

"राजे यशवंतराव होळकर महामेष" योजना पुढे सुरू ठेवणार आणि मेंढपाळ लाभार्थींना रक्कम थेट खात्यात जमा करणार असल्याचा निर्णय आज राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

वर्धापन दिन

आकाशवाणी आज आपला सत्त्यावणावा वर्धापन दिन साजरा करत आहे. १९२७ साली आजच्या दिवशी आकाशवाणीचं पहिलं केंद्र मुंबई इथं सुरू झालं. इंडियन ब्रॉडकास्टिंग कंपनी नावानं सुरू झालेलं हे केंद्र १९५७ नंतर आकाशवाणी या नावानं प्रसिद्ध झालं.

हवामान

विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये आज वादळी पर्जन्यमान आणि पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. उद्या अमरावती आणि चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. आज नागपुरात दिवसभर ढगाळ वातावरण होतं मात्र वृष्टी झाली नाही. हवामान खात्याने उद्या अमरावती, वर्धा, नागपूर आणि चंद्रपूरसाठी पावसाचा येलो अलर्ट जारी केला आहे.मागील २ दिवसांपासून भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर तालुक्यात होत असलेल्या अतिवृष्टीमुळे तालुक्यातील विविध गावातील तब्बल १०५ घरांमध्ये पावसाच्या पुराच पाणी शिरल. काहींची अंशतः तर काहींची पूर्णतः अशा एकूण १०४ घरांची पडझड झाली आहे. मागील दोन दिवसात चंद्रपूर जिल्ह्याला पावसाचा चांगलाच तडाखा बसल्यावर सोमवारी पावसान सकाळपासून विश्रांती घेतल्यामुळे दिलासा मिळाला आहे. दरम्यान इरई धरणाचे सर्व दरवाजे अद्यापही अर्धा मीटरने उघडेच असल्याची माहिती प्रशासकीय सूत्रांनी दिली. दरम्यान अकोल्यात काल रिमझिम तर आज माध्यम स्वरूपाच्या पावसाने हजेरी लावली आहे. मागील चोवीस तासांत

गडचिरोलीतील कोरची इथं ११४ पूर्णांक २ दशांश मिलीमीटर पावसाची नोंद करण्यात आली आहे. गडचिरोली जिल्ह्यात २० मार्गांवरची वाहतूक अजूनही ठप्प आहे.

*****